// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

**प्रसिद्धीसाठी**

## 'महिला आयोग आपल्या दारी' शनिवारी नंदुरबार जिल्ह्यात

## अधिकाधिक महिलांनी पुढे येऊन, न घाबरता आपल्या तक्रारी मांडाव्या - विजया रहाटकर यांचे आवाहन

मुंबई, दि ०१ जानेवारी, २०१९-महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमा अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील तक्रारींची जनसुनावणी शनिवार, दि.०५/०१/२०१९ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय इमारत, बिरसा मुंडा हॉल येथे होणार असून आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर या स्वतः तक्रारींची सुनावणी घेणार आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत प्रयत्न करत आहे. महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. यामध्ये विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न आहे. या जनसुनावणीवेळी पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणं आर्थिकदृष्ट्या तसंच इतर कारणामुळे शक्य होत नाही. त्यांना याउपक्रमाचा फायदा होणार आहे. महिला आयोग आपल्या दारीअंतर्गत सुनावणी दरम्यान नव्या तक्रारींवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचं काम आयोग याद्वारे करत आहे.

**आढावा बैठक** - याचबरोबर नंदुरबार जिल्ह्यातील समुपदेशन केंद्र, महिला सहाय्य कक्ष, नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती, कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळ रोखण्यासाठी कार्यरत अंतर्गत तक्रार निवारण समिती आदींच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल. या आढावा बैठकीस जिल्हा पातळीवरील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतील.

नंदुरबार जिल्ह्यात होणाऱ्या जनसुनावणीत अधिकाधिक महिलांनी पुढे येऊन, न घाबरता आपल्या तक्रारी यावेळी मांडाव्या, असे आवाहन आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रहाटकर यांनी केले आहे.

***

संपर्क - श्रीमती कपालिनी सिनकर - जनसंपर्क अधिकारी – ९८१९५४७९११.